




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : १९८ • पुणे • बुधवार, दि. ०८ एप्रिल २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313


## ठळक बातम्या

### पूर्वाश्रमीच्या पतीवर गंभीर आरोप : एकबोटे

पुणे (आरंभ पर्व) : सायली उर्फ आद्या शैलेश सुर्वे यांच्या घरवापसी प्रकरणात अनेक गंभीर बाबी समोर आल्या आहेत. सायली यांचे पूर्वाश्रमीचे पती आतिफ तासे हा अट्टल गुन्हेगार असून त्याच्यावर विविध गुन्ह्यांची नोंद असल्याचा आरोप समस्त हिंदू आघाडीचे कार्याध्यक्ष मिलिंद एकबोटे यांनी केला आहे. पत्रकार परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. यावेळी समीर कुलकर्णीही उपस्थित होते. एकबोटे यांच्या माहितीनुसार, गेल्या दहा वर्षांपासून आतिफ तासेने सुर्वे कुटुंबाला मानसिक व शारीरिक छळ दिला. सततच्या मारहाण आणि अत्याचारामुळे सायली यांनी अखेर घटस्फोट घेऊन घरवापसीचा निर्णय घेतला. आतिफ तासेवर गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून, भ्रष्टाचारामुळे प्रशासन त्याच्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही एकबोटे यांनी केला. त्यामुळे तो समाजात मुक्तपणे वावरत असून नागरिकांना त्रास देत असल्याचे म्हटले आहे.

### जनतेला मिळणार आरोग्य सुविधा

मुंबई (आरंभ पर्व) : जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या "माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव" या महत्त्वाकांक्षी अभियानाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री उपस्थित होते. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी अभियानाविषयी मंत्रिमंडळाला माहिती दिली. अभियानाविषयी माहिती देण्यात येणाऱ्या व्हिडिओ आणि पुस्तिकेचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते यावेळी करण्यात आले.

### पार्थदादा खरे तेच बोललेत : मिटकरी


मुंबई (आरंभ पर्व) : सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी खासदार पार्थ पवार यांनी काँग्रेसवर केलेल्या टीकेचे परखड शब्दांत समर्थन केले आहे. पार्थदादा पवार यांचे विधान काँग्रेसला फारच झोंबले आहे. यामुळेच काँग्रेसचा डाऊनफॉल सुरू सुरू असल्याच्या त्यांच्या विधानानंतर एरवी डबक्यात लपून बसलेली बेडके बाहेर पडून एकदम डऱ्याव डऱ्यावर करत आहेत, असे ते म्हणालेत. पार्थ पवार यांनी बारामती विधानसभेची पोटनिवडणूक लढवणाऱ्या काँग्रेसवर निशाणा साधताना राज्यात काँग्रेसचा डाऊनफॉल सुरू झाल्याचा आरोप केला आहे. त्यानंतर काँग्रेसने त्यांच्यावर सडकून टीका करत ते एक कृतघ्न मुलगा असल्याचा आरोप केला होता. विशेषतः शरद पवार, सुप्रिया सुळे व आमदार रोहित पवार यांनीही या प्रकरणी पार्थ पवारांचे कान टोचले होते. यामुळे पार्थ पवार यांच्या राजकीय परिपक्वतेविषयी संशय व्यक्त केला जात असताना राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी त्यांच्या विधानाचे जोरदार समर्थन केले आहे.

# भोंदूचे 'RTO' कनेक्शन उघड

## दोन बड्या अधिकाऱ्यांची नावे समोर; १०० बँक खात्यांच्या चौकशीने खळबळ

**नाशिक (दै. आरंभ पर्व)**

महिलांचे लैंगिक शोषण, अवैध सावकारकी आणि आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात अडकलेल्या भोंदू बाबा अशोक खरात याच्या कारनाम्यांचे धागेदोरे आता थेट सरकारी यंत्रणेपर्यंत पोहोचले आहेत. या प्रकरणाच्या तपासात परिवहन विभागातील (RTO) दोन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची नावे समोर आली असून, त्यांच्यासह कुटुंबीयांच्या नावे असलेल्या संशयास्पद बँक खात्यांमुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. 'समता' पतसंस्थेतील या संशयास्पद व्यवहारांमुळे आता या प्रकरणाची व्याप्ती वाढली असून तपास यंत्रणांनी आपला फास आवळण्यास सुरुवात केली आहे.



भोंदू अशोक खरातच्या काळ्या कारनाम्यांमुळे अवघ्या राज्यात संतापाची लाट उसळली आहे. खरातवर अनेक महिलांचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी आतापर्यंत त्याच्यावर 13 गुन्हे दाखल झालेत. यातील 8 गुन्हे लैंगिक शोषणाचे, 4 गुन्हे आर्थिक फसवणुकीचे, तर एक गुन्हा ईडीने दाखल केलेला मनी लाँड्रिंगचा आहे. त्यातच आता परिवहन विभागाच्या (RTO) दोन बड्या अधिकाऱ्यांची नावे तपासात समोर आल्याची माहिती मिळत आहे.

शिर्डी पोलिसांनी खरातच्या आर्थिक व्यवहारांची पाळेमुळे खणून काढताना ५६ व्यक्तींच्या नावावर असलेल्या १०० हून अधिक बँक खात्यांची चौकशी सुरू केली आहे. यामध्ये आरटीओ विभागातील दोन बड्या अधिकाऱ्यांच्या आणि त्यांच्या जवळच्या नातेवाईकांच्या नावावर खाती उघडण्यात आल्याची धक्कादायक माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. हे व्यवहार केवळ सावकारकीपुरते मर्यादित आहेत की मोठ्या प्रमाणावर काळा पैसा पांढरा करण्यासाठी या खात्यांचा वापर करण्यात आला, या दिशेने विशेष तपास पथक (SIT) आता सखोल तपास करत आहे.

तपास यंत्रणांसमोर आता सर्वात मोठा प्रश्न हा आहे की, संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतःच्या संमतीने ही खाती उघडली होती की त्यांच्या वैयक्तिक आणि गोपनीय कागदपत्रांचा गैरवापर करून खरातने ही 'बेनामी' खाती तयार केली? जर ही खाती बनावट असतील, तर या अधिकाऱ्यांची अत्यंत गोपनीय कागदपत्रे एका भोंदू बाबाच्या हाती कशी लागली? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. या संशयास्पद व्यवहारामुळे या दोन्ही अधिकाऱ्यांना कोणत्याही क्षणी चौकशीसाठी पाचारण केले जाण्याची दाट शक्यता आहे.

### ईडीची एन्ट्री आणि वाढीव कोठडीची शक्यता

**प्रकरणाचे गांभीर्य आणि कोट्यवधींच्या आर्थिक गैरव्यवहाराचे स्वरूप लक्षात घेता, आता अंमलबजावणी संचालनालयाने (ED) देखील या प्रकरणात उडी घेतली आहे. एसआयटीच्या हाती काही अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचे दस्तऐवज लागले असून गेल्या काही तासांपासून खरातची कसून चौकशी केली जात आहे. उद्या खरातला न्यायालयात हजर केले जाणार असून, तांत्रिक पुरावे सादर करून पोलीस त्याच्या वाढीव कोठडीची मागणी करणार आहेत.**

## पार्थ काँग्रेसच्या बाबतीत चुकला

### रोहित पवारांनीही टोचले पार्थ पवारांचे कान

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी काँग्रेसचा डाऊनफॉल सुरू झाल्याची टीका करणाऱ्या पार्थ पवारांचे कान टोचलेत. पार्थ पवार काँग्रेसच्या बाबतीत चुकले. असा कोणताही पक्ष संपत नसतो. या प्रकरणी नेहमी जमिनीवर राहणे महत्त्वाचे, असे ते म्हणालेत. पार्थ पवार यांनी बारामती विधानसभेची पोटनिवडणूक लढवणाऱ्या काँग्रेसवर निशाणा साधताना राज्यात काँग्रेसचा डाऊनफॉल सुरू झाल्याचा आरोप केला होता. त्यानंतर काँग्रेसने त्यांच्यावर सडकून टीका केली होती. विशेषतः शरद पवार व सुप्रिया सुळेंनीही या प्रकरणी पार्थ पवारांचे कान टोचले होते. त्यानंतर आता आमदार रोहित पवार यांनीही पार्थ पवारांचे काँग्रेसचे विषयीचे विधान चुकल्याचा दावा केला आहे.



तसेच बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध होण्यासाठी सत्ताधारी राष्ट्रवादीचे नेते काँग्रेसशी संवाद साधतील असा विश्वासही व्यक्त केला आहे. रोहित पवार म्हणाले, फॉर्म भरण्याची एक तारीख असते आणि फॉर्म मागे घेण्याची दुसरी तारीख असते. बऱ्याच मतदारसंघात अनेकजण फॉर्म भरतात आणि मागे घेतात. त्यासाठी संवाद व चर्चा करायची असते. या प्रकरणी एक राजकीय परिपक्वता दाखवायची असते. पण काल पार्थ पवारांनी घाईगडबडीने स्टेटमेंट केले. तरीसुद्धा काकी स्वतः असतील किंवा त्यांचे इतर नेते असतील, ते काँग्रेसशी चर्चा करून योग्य तो मार्ग काढतील. तुम्ही सत्तेत असला काय किंवा विरोधात असला काय, तुम्ही जमिनीवर राहणे महत्त्वाचे असते. काल पार्थ पवारांनी केलेले विधान योग्य नव्हते. त्यात कुठे ना कुठे तरी घाईगडबड जाणवली.

## पार्थ पवारांच्या मदतीला NCP ची फौज

- काँग्रेसवर पलटवार करत काढला राहुल गांधींच्या कर्तृत्वाचा मुद्दा
- जशास तसे प्रत्युत्तर देणार



**महाराष्ट्र काँग्रेसने पार्थ पवारांवर टीका करताना त्यांचा उल्लेख कृतघ्न मुलगा असा केला होता. काँग्रेसने म्हटले होते, धड भाषणही देता न येणाऱ्या, कुटुंबीयांच्या पुर्वपुण्याईवर आताच खासदार झालेल्या मुलाने काँग्रेस पक्षाच्या डाऊनफॉल बद्दल बोलणं, म्हणजे जरा जास्तच नाही का झालं? स्वतःच्या वडिलांच्या संशयास्पद अपघाती मृत्यूनंतर लगेच जमीन घोटाळ्यातील चौकशीतून बचावासाठी राजकीय सोय म्हणून शांत राहणाऱ्या, महाशक्तिसमोर सरेंडर झालेल्या या कृतघ्न मुलाने काँग्रेस पक्षाबद्दल न बोललेलंच बरं राहील.**

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

काँग्रेसने बारामती विधानसभा पोटनिवडणुकीवरून खासदार पार्थ पवार यांच्यावर कृतघ्न मुलगा म्हणत जहरी टीका केली आहे. त्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसनेही काँग्रेसवर जोरदार पलटवार करत काँग्रेसला दुसऱ्यांवर टीका करण्यापेक्षा आपले नेते राहुल गांधींच्या कामगिरीकडे पाहण्याचा टोला हाणला आहे. काँग्रेसने आमच्या नेत्यावर टीका करण्यापेक्षा राहुल गांधी यांनी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत काय केले ते अगोदर पाहावे, असे राष्ट्रवादीने म्हटले आहे. पार्थ पवार यांनी बारामती विधानसभेची पोटनिवडणूक लढवणाऱ्या काँग्रेसवर निशाणा साधताना राज्यात काँग्रेसचा डाऊनफॉल सुरू झाल्याचा आरोप केला होता. त्यानंतर काँग्रेसने त्यांच्यावर सडकून टीका केली होती. विशेषतः शरद पवारांनीही त्यांच्या राजकीय परिपक्वतेवर निशाणा साधला होता. त्यानंतर खासदार सुप्रिया सुळे यांनीही पार्थ पवारांना काँग्रेसचे मोठेपण लक्षात आणून देत आपण स्वतः व पार्थ यांचे वडील अजित पवारही काँग्रेसच्या मुशीत तयार झाल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस सूरज चव्हाण यांनी पार्थ पवारांवर होणारी टीका फेटाळताना राहुल गांधींवर निशाणा साधला आहे. सूरज चव्हाण म्हणाले, काँग्रेसने आमच्या नेत्यांवर टीका करण्यापेक्षा राहुल गांधी यांनी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत काय केले ते अगोदर पाहावे. एखाद्या नेत्याच्या निधनानंतर त्याच्या कुटुंबातील व्यक्ती पोटनिवडणूक लढवत असेल तर ती निवडणूक बिनविरोध करणे ही महाराष्ट्राची परंपरा आहे. पण काँग्रेसने ती परंपरा पाळली नाही. काँग्रेसने राजकीय परंपरेला छेद देण्याचे काम केले. बारामतीची पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी ही महाराष्ट्राची जनभावना आहे. पण या जनभावनेपासून दूर गेलेली काँग्रेस ही निवडणूक लढवण्यावर ठाम आहे.

काँग्रेसच्या या भूमिकेचा दाखला देत पार्थ पवारांनी काँग्रेसचे डाऊनफॉल सुरू होईल असे विधान केले होते. त्यांच्या या विधानाला प्रत्युत्तर देताना त्यांच्यावर खालच्या पातळीवर टीका केली जात आहे. काँग्रेसने आमच्या नेत्यांवर पुन्हा अशी टीका केली तर त्याला जशास तसे प्रत्युत्तर दिले जाईल, असे ते म्हणाले. या मुलाच्या वडिलांना न्याय मिळवून देण्यासाठी कर्नाटक सरकार ने त्यांच्या राज्यात FIR नोंद करून घेतला, तिथे सरकार काँग्रेस पक्षाचे आहे, कॉंग्रेस पक्षाचेच बारामती विधानसभा पोटनिवडणूकीतील अधिकृत उमेदवार त्या संशयास्पद अपघाताचा महाराष्ट्रात गुन्हा नोंद करा, निवडणूकीतून माघार घेईल, अशी मागणी करत आहेत. यावरही या कृतघ्न मुलाने बोलायला हवे, असे काँग्रेसने म्हटले आहे.

## कुंभमेळ्यासारख्या पवित्र उत्सवाला भ्रष्टाचाराचे कुरण बनवले

### विलास लाडच्या ऑडिओ क्लिपवरून विजय वडेट्टीवार आक्रमक

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

मंत्रालयात 6 लाख 37 हजारांची लाच घेताना रंगेहात पकडलेला कक्ष अधिकारी विलास लाड याची एक खळबळजनक ऑडिओ क्लिप समोर आली असून, यामध्ये त्याने नाशिक कुंभमेळ्याच्या टेंडर प्रक्रियेबाबत धक्कादायक दावे केले आहेत. या कथित क्लिपमध्ये कुंभमेळ्यासाठीची सुमारे 1021 प्रकारची कामे 'मॅनेज' करून ठराविक लोकांना दिली जाणार असून, त्यातून कोट्यवधींचे कमिशन मिळणार असल्याचे लाड बोलताना दिसत आहे. या दाव्यांमुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. यावरून कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी टीका केली आहे. ते म्हणाले, कुंभमेळ्यासारख्या पवित्र उत्सवाला अक्षरशः भ्रष्टाचाराचे कुरण बनवणाऱ्या सत्ताधाऱ्यांचा एक एक पराक्रम आता उघड होत आहे. लाचखोरीच्या आरोपाखाली अटकेत असलेला मंत्रालयातील कक्ष अधिकारी विलास लाड याची एक ऑडियो क्लिप सध्या व्हायरल होत आहे. यात तो अधिकारी कुंभमेळ्याचे अनेक टेंडर 'मॅनेज' झाल्याचा, कोट्यवधी रुपयांच्या कमिशनचा दावा करत आहे. या प्रकरणाची, या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी झाली पाहिजे. यात कोण कोण मंत्री, अधिकारी सामील आहेत हे समोर आले पाहिजे, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे. दरम्यान, एसीबीच्या अटकेत असलेला मंत्रालयातील कक्ष अधिकारी विलास लाड याची एक कथित ऑडिओ क्लिप सध्या चर्चेत असून, यात त्याने नाशिक कुंभमेळ्यातील निविदा प्रक्रिया आणि त्यातून मिळणाऱ्या कमिशनबाबत धक्कादायक दावे केले आहेत. या संभाषणात तो समोरच्या व्यक्तीला कोट्यवधींच्या कमिशनचे आमिष दाखवताना आणि टेंडर 'मॅनेज' करण्याबाबत बोलताना ऐकायला मिळत आहे. दरम्यान, या ऑडिओ क्लिपमधील विलास लाडच्या विधानांमध्ये कितपत तथ्य आहे, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत स्पष्टता समोर आलेली नसली, तरी या प्रकरणामुळे प्रशासकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.



### ५०० कोटींचा मोठा कोटा असल्याचा दावा

**राज्य आणि केंद्र सरकारकडून कुंभमेळ्यासाठी 15 हजार कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, त्यातील 500 कोटींचा मोठा कोटा आपल्याकडे असल्याचा दावा विलास लाडने या कथित ऑडिओ क्लिपमध्ये केला आहे. यामध्ये त्याने स्वतः 700 तंबूंचे काम, ई-टॉयलेट आणि साफसफाईची टेंडर्स मिळवल्याचे म्हटले आहे. विशेष म्हणजे, 18 कोटींचे नाश्ता आणि जेवणाचे कंत्राटही आपल्याकडेच असून, 40 दिवसांच्या या सोहळ्यात प्रत्यक्ष खर्च कमी आणि कमिशनचे प्रमाण मोठे असल्याचे प्रलोभन तो समोरच्या व्यक्तीला देताना दिसत आहे.**

## आमिष दाखवत मांत्रिकाचा विवाहितेवर अत्याचार

**नागपूर (दै. आरंभ पर्व)**



नागपूरमध्ये हरवलेल्या पतीला परत आणण्याचे आमिष दाखवून एका मांत्रिकाने विवाहितेवर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. सक्करदरा पोलिसांनी या प्रकरणी ६५ वर्षीय आरोपी ताहीर रशीद बेग याला अटक केली आहे. आरोपीने आणखी किती महिलांना फसवले आहे, याचा तपास सध्या सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला ३६ वर्षांची असून घरकाम करून उदरनिर्वाह करते. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी तिचा पती अचानक बेपत्ता झाल्यानंतर ती मानसिकदृष्ट्या खचली होती. याच परिस्थितीचा गैरफायदा घेत आरोपी ताहीर रशीद बेग याने स्वतःला मांत्रिक म्हणून सादर केले आणि तिचा विश्वास संपादन केला. एका कार्यक्रमात ओळख झाल्यानंतर आरोपीने जादूटोणा आणि विशेष पूजा करून तिचा पती परत आणू शकतो, असा दावा केला. सुरुवातीला काही विधी करून त्याने पीडितेचा विश्वास जिंकला. त्यानंतर 'विशेष पूजा'च्या नावाखाली त्याने तिला एकांतात बोलावले. त्यावेळी आरोपीने तिच्या नातेवाईकांना बाहेर बसवून तिला धमकावले आणि तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केला. तपासात असेही समोर आले आहे की, या घटनेनंतर आरोपीने पीडितेच्या घरी जाऊनही तिच्यावर पुन्हा अत्याचार केला. पीडितेने तक्रार दाखल करताच पोलिसांनी तात्काळ कारवाई करत आरोपीला अमरावती जिल्ह्यातील अंजनगाव परिसरातून अटक केली.

# भोंदू खरातच्या फरार पत्नीला कुणाचे अभय? : तृप्ती देसाई

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नाशिकमधील खरात लैंगिक शोषण प्रकरणामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी भूमाता ब्रिगेडच्या संस्थापक-अध्यक्षा तृप्ती देसाई यांनी नाशिक पोलिस आणि विशेष तपास पथकाच्या (एसआयटी) कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. खरातची पत्नी आणि मुलगा फरार झाल्याने त्यांना कोणाचे अभय आहे, असा सवाल देसाई यांनी केला.

देसाई म्हणाल्या की, खरात प्रकरणात अनेक निष्पाप महिलांचे लैंगिक शोषण झाले आहे. हे प्रकरण गंभीर असतानाही काही राजकीय महिला नेत्या यात 'राजकीय पोळी' भाजण्याचा प्रयत्न करत आहेत. पीडितांना न्याय मिळवून देण्याऐवजी आरोप-प्रत्यारोपांच्या माध्यमातून मूळ मुद्द्यावरून लक्ष विचलित केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.




एसआयटीचा तपास गुप्तपणे सुरू असतानाही मुख्य आरोपी अशोक खरातची पत्नी आणि मुलगा फरार कसे झाले, असा प्रश्न देसाईंनी उपस्थित केला. खरातच्या पत्नीने तोंड उघडल्यास अनेक बड्या राजकारण्यांची नावे समोर येतील, या भीतीनेच त्यांना फरार करण्यात आल्याचा खळबळजनक संशय त्यांनी व्यक्त केला. खरातच्या पत्नीने अटकपूर्व जामिनासाठी अर्ज करणे हे पोलिसांच्या अपयशाचे लक्षण असल्याचेही देसाईंनी नमूद केले.

नाशिक पोलिसांच्या कार्यपद्धतीवरही देसाईंनी टीका केली. सुरुवातीला लोक पोलिसांवर विश्वास नसल्यामुळे पुरावे घेऊन जाण्यास कचरत होते. यापूर्वीही अनेक प्रकरणे दाबण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप त्यांनी केला. मुख्यमंत्र्यांनी स्वतः फोन करून आदेश दिल्यानंतरच नाशिक पोलिसांनी गुन्हा दाखल करून खरातला अटक केली, असे देसाईंनी सांगितले.

अशोक खरातने केलेल्या 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए' या विधानाचा देसाईंनी समाचार घेतला. खरातने केलेल्या पापांमुळे आता त्याला कायद्याने झुकवलेच आहे, असे त्या म्हणाल्या. त्याचा 'माज' उतरवण्याचे काम प्रशासनाने कायमस्वरूपी करावे, अशी मागणी त्यांनी केली.

### नाशिक पोलिस अन् SIT तपासावर गंभीर प्रश्नचिन्ह

**नाशिकमध्ये अटक करण्यात आलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणात रोज नवे धक्कादायक तपशील समोर येत आहेत. अटकेनंतर सुरुवातीला पोलिसांशी उद्धटपणे वागणारा आणि त्यांनाच उलट शाप देण्याचा प्रयत्न करणारा खरात आता पूर्णपणे खचल्याचे चित्र दिसत आहे. तुम्ही पाप करत आहात, तुमच्यावर कोप होईल, अशा शब्दांत पोलिसांना घाबरवण्याचा प्रयत्न करणारा हा भोंदू बाबा आता कोठडीत शांत झाला असून, त्याचा सगळा आव उतरल्याची माहिती समोर आली आहे.**

# डॉएच्च बँक-अक्षय पात्रा फाऊंडेशन तर्फे स्वयंपाकघराचा शुभारंभ

- नुकतेच उद्घाटन झालेले स्वयंपाकघर 'पीएम पोषण' उपक्रमाचा भाग असून, पुण्याच्या २९ शाळांमधील २५,००० मुलांना पौष्टिक माध्यान्ह भोजन पुरविणार




**पुण्यातील या स्वयंपाकघराचा शुभारंभ हा संपूर्ण भारतात उच्च-प्रभाव असलेल्या पोषण उपक्रमांचा विस्तार करण्यासाठी अक्षय पात्रा फाऊंडेशन करत असलेल्या प्रयत्नांतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. हे केंद्र सुदृढ आणि सुशिक्षित राष्ट्र घडवण्याच्या सामायिक दृष्टिकोनाला अधिक बळकट करते. तसेच, बालकांचे पोषण आणि शिक्षणामध्ये सातत्यपूर्ण गुंतवणूक करून 'विकसित भारत' हे व्यापक ध्येय गाठण्याच्या दिशेने टाकलेले पुढचे पाऊल होय. डॉएच्च बँक आणि अक्षय पात्रा यांच्यातील भागीदारी २०१४ पासून सुरु झालेली आहे आणि भुकेमुळे कोणतेही बालक शिक्षणापासून वंचित राहू नये, या विश्वासावर ही भागीदारी आधारलेली आहे. गेल्या दशकात, बँकेने गांधीनगर, जयपूर, बेंगळुरू आणि पुणे येथील सुमारे पाच लाख मुलांना माध्यान्ह भोजन पुरवण्यास मदत केलेली आहे. तसेच आपत्तीच्या काळात मदतकार्यही केले आहे. या भागीदारीतील एक ऐतिहासिक क्षण म्हणजे जानेवारी २०२६ मध्ये डॉएच्च बँकेने १० कोटी (१०० दशलक्ष) व्यक्तींना जेवण देण्याचा टप्पा ओलांडला आणि या विलक्षण क्षणाचे औचित्य साधताना जयपूरमध्ये एका विशेष कार्यक्रमाचे आयोजनसुध्दा करण्यात आले होते.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बालकांचे पोषण आणि शिक्षणाप्रती असलेली आपली सामूहिक वचनबद्धता आणखी दृढ करताना डॉएच्च बँकेने (Deutsche Bank) भारतात त्यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत 'अक्षय पात्रा फाउंडेशन' सोबत भागीदारी केली आहे. अक्षय पात्रा फाउंडेशन भारत सरकारच्या 'पीएम पोषण' योजनेची अंमलबजावणी करणारी सामाजिक संस्था आहे. या भागीदारी अंतर्गत आज पुण्याच्या शिवाजीनगर भागात अत्याधुनिक मध्यवर्ती स्वयंपाकघराचे (सेंट्रल किचन) उद्घाटन करण्यात आले.

डॉएच्च बँक ग्रुप (भारत आणि इमर्जिंग एशिया) चे सीईओ श्री. कौशिक शपारिया आणि डॉएच्च बँकेच्या कॉर्पोरेट अफेअर्स अँड स्ट्रॅटेजी विभागाचे ग्लोबल हेड श्री. बेंजामिन अल्का यांच्या हस्ते या स्वयंपाकघराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अक्षय पात्रा फाउंडेशनचे सीईओ श्री. श्रीधर व्यंकट, राष्ट्रीय अध्यक्ष श्री. भरतर्षभ (Bharatarshabha) दास आणि पुणे विभागाचे प्रादेशिक अध्यक्ष श्री. संपाती दास हे मान्यवर उपस्थित होते. पुण्यातील २९ सरकारी आणि अनुदानित शाळांमधील २५,००० मुलांना गरम, पौष्टिक आणि सकस आहार देण्याच्या उद्देशाने या मध्यवर्ती स्वयंपाकघराची रचना करण्यात आलेली आहे. शाळेलगतच्या परिसरातील मुलांची शालेय उपस्थिती वाढवण्यासाठी त्याचबरोबर त्यांच्या पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि त्यांना अधिकाधिक शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यात हे स्वयंपाकघर अतिशय महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

सदर केंद्राच्या उभारणीतून पुण्यातील शालेय पोषण आहार व्यवस्थेला अधिक बळकट करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल टाकण्यात आले आहे. तब्बल २०,००० चौरस फूट क्षेत्रफळात पसरलेले हे स्वयंपाकघर अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि कार्यक्षमता आदी उच्च मानकांनुसार साकारण्यात आलेले आले आहे. या केंद्राभोवतालच्या २० किलोमीटर परिसरातील शाळांमध्ये भोजन पुरविले जाणार आहे. भोजन पुरवठ्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर केला जाणार आहे. यातून सामाजिक प्रभावासोबतच पर्यावरणाप्रतीची वचनबद्धतासुध्दा अधोरेखित झाली आहे.

याप्रसंगी बोलताना डॉएच्च बँक ग्रुप (भारत आणि इमर्जिंग एशिया) चे सीईओ श्री. कौशिक शपारिया म्हणाले: "मानवी संसाधनांमध्ये केलेली गुंतवणूक हीच सर्वात चिरस्थायी गुंतवणूक असते, ही डॉएच्च बँकेची मनोधारणा आहे. पुण्यातील या स्वयंपाकघराचे उद्घाटन हे 'अक्षय पात्रा 'सोबतच्या आमच्या घट्ट आणि मजबूत अशा भागीदारीचे प्रतीक होय. पुरेशा अन्नाअभावी कोणत्याही मुलाचे शिक्षण थांबू नये, ही आमची सामायिक धारणा आहे. भारताचे भविष्य आज शाळाशाळांमधील वर्गांमध्ये फुलत असताना, पुण्यातील अधिकाधिक मुलांना त्यांच्या हक्काचे पोषण आणि शिक्षण मिळावे, ही आमची वचनबद्धता या स्वयंपाकघरातून दिसून येते. अक्षय पात्रा सोबतच्या आमच्या भागीदारीने आता तब्बल १० कोटी व्यक्तींना अन्न पुरविण्याचा टप्पा ओलांडला, याचा मला विशेष आनंद होतोय."

अक्षय पात्रा फाऊंडेशनचे सीईओ श्रीधर व्यंकट म्हणाले, "आम्ही उभारलेले प्रत्येक स्वयंपाकघर हे मुलांसाठी, त्यांच्या वर्गासाठी आणि पर्यायाने राष्ट्राप्रती एक वचनबद्धता आहे. 'पीएम पोषण' चौकटींतर्गत अतिशय सक्षम सार्वजनिक-खासगी भागीदारी काय साध्य करू शकते, याचे जिवंत उदाहरण म्हणजे पुण्याचे हे केंद्र होय. डॉएच्च बँकेने दिलेल्या सातत्यपूर्ण पाठिंब्याबद्दल आणि भारत सरकार व महाराष्ट्र सरकारने दाखवलेल्या विश्वासाबद्दल आणि सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोत."

# मुक्ताईनगरच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा

- ३८५ कोटींचा भरघोस निधी मंजूर!
- ४१३ घरांचा प्रश्न सुटला
- जलसंपदा व मदत पुनर्वसन मंत्र्यांच्या बैठकीत ऐतिहासिक निर्णय



**मुक्ताईनगर (दै. आरंभ पर्व)**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुक्ताईनगरमधील पुनर्वसनाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. मुंबई येथे झालेल्या महत्त्वपूर्ण संयुक्त बैठकीत मुक्ताईनगर शहर आणि परिसरातील विविध गावांच्या पुनर्वसन कामांसाठी ३८५ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे हजारो ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला असून विकासाचा नवा मार्ग प्रशस्त झाला आहे.

मुंबई येथे जलसंपदा मंत्री ना. गिरीश महाजन आणि मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंद आबा पाटील यांच्या उपस्थितीत ही संयुक्त बैठक पार पडली. या बैठकीत मतदार संघातील प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा होऊन निधीची तरतूद करण्यात आली. यावेळी वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, आमदार चंद्रकांत सोनवणे, जळगावचे जिल्हाधिकारी रोहन घुगे, नंदूभाऊ महाजन, विनोदभाऊ तराळ आणि विविध गावांतील ग्रामस्थ प्रतिनिधी उपस्थित होते.

या निधीतून प्रामुख्याने खालील कामांना गती मिळणार आहे:

मुक्ताईनगर शहर: रखडलेल्या ४१३ घरांचा आणि तिसऱ्या टप्प्यातील २२ घरांचा पुनर्वसन प्रश्न कायमचा सुटणार आहे.

नागरी सुविधा: विविध गावांमधील प्रलंबित नागरी सुविधा आणि नवीन घरांच्या प्रस्तावांसाठी या निधीचा विनियोग केला जाईल.

भोकरी, पातोंडी, सुलवाडी, कोळोदा, अंतुर्ली, धामणदे, नरवेल, पिंप्री नांदू, बेलसवाडी, मुंडोळदे खडकाचे, मुंढोदे, उचंदा शेमळदे, मेळसांगवे, पंचाणे, खामखेडा, भामलवाडी, शिंगाडी, मांगलवाडी, कांडवेल, तांदलवाडी, पुरी गोलवाडे, घोडसगाव, चिचखेडा बुद्रुक आणि आंदलवाडी. मुक्ताईनगर परिसरातील विस्थापितांचे प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित होते. वारंवार होणाऱ्या पाठपुराव्याला आता यश आले आहे. "विकासाचा संकल्प आणि प्रगतीचा मार्ग" हे ब्रीद सार्थ ठरवत, सरकारने दिलेल्या शब्द पाळल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. ३८५ कोटींच्या या निधीमुळे गावांचा कायापालट होणार असून मूलभूत सुविधांचा प्रश्न निकाली निघणार आहे.

# प्रशांत वाघमारे यांच्यावरील आरोप चुकीचे

- महापालिका आयुक्तांची भेट घेऊन समर्थकांनी मांडली भूमिका

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेचे माजी शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांच्यावर करण्यात आलेले आरोप पूर्णतः चुकीचे, निराधार आणि केवळ त्यांचे चारित्र्यहनन करण्याच्या उद्देशाने करण्यात आले आहेत, अशी भूमिका घेत आज विविध मान्यवरांच्या शिष्टमंडळाने पुणे महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांची भेट घेतली. यावेळी उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात सर्वोच्च न्यायालयात अपील करावे, अशी विनंतीही आयुक्तांना करण्यात आली. गेल्या काही दिवसांपासून प्रशांत वाघमारे यांच्या संदर्भात समाजमाध्यमांतून आणि बातम्यांमधून पसरवली जाणारी माहिती ही दिशाभूल करणारी आहे. वाघमारे हे एक कर्तव्यदक्ष आणि शहराच्या विकासात मोलाचे योगदान देणारे अधिकारी आहेत. त्यांच्या प्रदीर्घ सेवेला आणि प्रतिमेला धक्का लावण्यासाठी जाणीवपूर्वक हा प्रकार केला जात असल्याचे शिष्टमंडळाने आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिले.

याप्रसंगी उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक ॲड. अविनाश साळवे, बाळासाहेब जानराव, रिपाई शहराध्यक्ष संजय सोनवणे, रिपब्लिकन सोशालिस्ट पक्षाचे अध्यक्ष राहुल डंबाळे, महिपाल वाघमारे, ॲड. मोहन वाडेकर, माजी नगरसेवक जयदेव रंधवे आदी मान्यवर उपस्थित होते.

# फोर्स मोटर्सची देशांतर्गत विक्रीत २० टक्क्यांची भरीव वाढ

- ३६ हजारांहून अधिक वाहनांची विक्री

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

फोर्स मोटर्स या देशातील आघाडीच्या वाहननिर्माता कंपनीने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये देशांतर्गत विक्रीत तब्बल २० टक्क्यांची भरीव वाढ नोंदवली आहे. कंपनीने यंदा एकूण ३६,५३६ वाहनांची विक्री केली असून, मागील वर्षीच्या ३०,५३१ वाहनांच्या तुलनेत ही लक्षणीय वाढ ठरली आहे. मार्च महिन्यातील विक्रीतही वाढ दिसून आली आहे. मार्च २०२५ मध्ये ३,६०६ वाहनांची विक्री झाली होती, तर मार्च २०२६ मध्ये ती वाढून ४,१२६ वाहनांपर्यंत पोहोचली. यामध्ये १४ टक्क्यांची वाढ नोंदवण्यात आली आहे. शहरी व ग्रामीण भागात प्रवासी वाहतुकीची वाढती गरज, संस्थात्मक स्तरावर वाढलेली मागणी तसेच संरक्षण क्षेत्रातील मजबूत कामकाज यामुळे कंपनीच्या विक्रीत वाढ झाली आहे. सर्व प्रकारच्या वाहनांमध्ये सातत्याने वाढ झाल्याने एकूण कामगिरी मजबूत राहिली. कंपनीच्या प्रवासी वाहतूक वाहनांनी हलक्या व्यावसायिक वाहन विभागात ७० टक्क्यांहून अधिक बाजारहिस्सा कायम राखत नेतृत्व टिकवले आहे.

# खडसे महाविद्यालयात 'जागतिक आरोग्य दिन' उत्साहात साजरा



## विद्यार्थिनींचा आरोग्य संकल्प

**कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व विद्यार्थिनींनी स्वतःच्या आरोग्याप्रती सजग राहण्याचा आणि नियमित व्यायाम तसेच सकस आहार घेऊन 'निरोगी जीवनशैली' अंगीकारण्याचा सामूहिक संकल्प केला. या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी मोठी जनजागृती झाल्याचे पाहायला मिळाले.**

**मुक्ताईनगर (दै. आरंभ पर्व)**

बदलत्या जीवनशैलीत उत्तम आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी मुक्ताईनगर तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित श्रीमती जी. जी. खडसे महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थिनींना निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला. याप्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. रंजना गोरे उपस्थित होत्या. विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना त्यांनी शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याचा समतोल कसा राखावा, यावर प्रकाश टाकला. डॉ. गोरे म्हणाल्या की, "केवळ शारीरिक तंदुरुस्ती म्हणजे आरोग्य नव्हे, तर मानसिक शांतता आणि तणावमुक्त विचार हेदेखील आरोग्याचे महत्त्वाचे पैलू आहेत. जंक फूड टाळून संतुलित आहार घेणे आणि दररोज किमान ३० मिनिटे व्यायाम करणे ही काळाची गरज आहे." आजच्या धावपळीच्या युगात तरुणाईमध्ये वाढणारा ताणतणाव चिंतेचा विषय आहे. यावर भाष्य करताना त्यांनी योगासने आणि ध्यानाचे महत्त्व विषद केले. आरोग्याबाबत कोणत्याही तक्रारीकडे दुर्लक्ष न करता वेळीच डॉक्टरांचा सल्ला घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. ए. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. यावेळी क्रीडा संचालक प्रा. प्रतिभा ढाके यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय साधत विद्यार्थिनींना क्रीडा क्षेत्रातील संधी आणि शारीरिक क्षमतेबाबत प्रोत्साहित केले.

# बार्शी तालुक्यात अवैध दारू विक्रीवरून संताप

## कठोर कारवाईची नागेश चव्हाण यांची मागणी

### अवैध धंदे दारू मटका जुगार बंद करा, अन्यथा अधिकाऱ्यांच्या बदल्या करा

**बार्शी (दै. आरंभ पर्व)**



बार्शी तालुक्यातील वैराग पोलीस स्टेशनच्या हद्दीत सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून स्थानिक नागरिकांसह राजकीय स्तरावरही संताप व्यक्त केला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर जिल्हा सरचिटणीस नागेश चव्हाण यांनी या प्रश्नावर आक्रमक भूमिका घेत प्रशासनाला थेट इशारा दिला आहे.

अंबाबाईची वाडी, जवळगाव क्रमांक २ तसेच हत्तीज परिसरात मोठ्या प्रमाणावर अवैध दारू विक्री सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे. या बेकायदेशीर धंद्यामुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त होत असून महिलांमध्ये व ज्येष्ठ नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. परिसरातील युवकांवरही याचा विपरीत परिणाम होत असल्याचे चव्हाण यांचे म्हणणे आहे. नागेश चव्हाण यांनी सांगितले की, यापूर्वीही त्यांनी या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी केल्या असून अहवाल सादर केला होता. त्या वेळी प्रशासनाकडून तात्पुरती कारवाई करण्यात आली; मात्र काही दिवसांनंतर पुन्हा अवैध दारू विक्री सुरू होत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

"ही समस्या केवळ तात्पुरत्या कारवाईने सुटणार नाही. यासाठी कायमस्वरूपी आणि ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे," असे स्पष्ट मत चव्हाण यांनी व्यक्त केले. त्यांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, तात्काळ या अवैध धंद्यावर लगाम घालावा, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांची बदली करण्यात यावी.

तसेच, प्रशासनाने दुर्लक्ष केल्यास हा प्रश्न अधिक मोठ्या आंदोलनाच्या स्वरूपात उभा केला जाईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे. आवश्यक असल्यास कोल्हापूर परिक्षेत्र किंवा मुंबईत महिला भगिनींसह नागरिक त्यांच्या सोबतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, स्थानिक नागरिकांनीही या मागणीला जोरदार पाठिंबा दिला असून, अवैध दारू विक्रीमुळे वाढणारे गुन्हे, कुटुंबांतील तणाव आणि आर्थिक नुकसान यावर तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने केवळ दिखाऊ कारवाई न करता सातत्यपूर्ण आणि प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे. आता प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे किती गांभीर्याने पाहते, याकडे बार्शी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ११ एप्रिल रोजी 'ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२६'चे आयोजन

**पुणे (आरंभ पर्व) : भारतातील आघाडीच्या परदेशी शिक्षण सल्लागार संस्थांपैकी एक असलेल्या Study Smart तर्फे शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०:०० ते सायंकाळी ५:०० या वेळेत रॉयल कॉनॉट, बोट क्लब, पुणे येथे 'ग्लोबल एज्युकेशन फेअर २०२६'चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आणि पालकांना मोफत प्रवेश असून, परदेशात उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा एक 'वन-स्टॉप सोल्यूशन' ठरणार आहे. पत्रकार परिषदेत Study Smart चे व्यवस्थापकीय संचालक चेतन जैन यांनी सांगितले की, बारावीनंतर किंवा पदवी पूर्ण केल्यानंतर परदेशात शिक्षण घेण्याचे स्वप्न अनेक विद्यार्थी पाहतात. मात्र योग्य विद्यापीठाची निवड, प्रवेश प्रक्रिया, शिष्यवृत्ती, आर्थिक नियोजन आणि निवास व्यवस्था याबाबत अनेकांना संभ्रम असतो. हा गोंधळ दूर करण्यासाठी या फेअरची रचना करण्यात आली असून, यूके, यूएसए, आयर्लंड, जर्मनी, दुबई, युरोप आदी देशांतील ६० पेक्षा अधिक नामांकित विद्यापीठांचे प्रतिनिधी थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधणार आहेत. या फेअरमध्ये शिष्यवृत्ती, आर्थिक सहाय्य, सप्टेंबर २०२६ प्रवेश प्रक्रिया, स्पॉट ॲडमिशन ऑफर्स, आयएलटीएस सवलत, तसेच शिक्षणानंतरच्या नोकरी व करिअर संधी यावर मार्गदर्शन करणाऱ्या कार्यशाळाही आयोजित केल्या जाणार आहेत. तसेच Study Smart चे प्रमाणित तज्ज्ञ समुपदेशक विद्यार्थी व पालकांना वैयक्तिक मार्गदर्शन देऊन त्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी योग्य निर्णय घेण्यास मदत करतील.**

### IAT 2026 नोंदणीसाठी १३ एप्रिल अंतिम मुदत; विद्यार्थ्यांना संधी




**पुणे (आरंभ पर्व) : आयआयएसईआर अभियोग्यता चाचणी (IAT) 2026 साठी ऑनलाइन अर्ज करण्याची अंतिम मुदत १३ एप्रिल २०२६ असून, विज्ञान शिक्षण व संशोधन क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही शेवटची संधी ठरणार आहे. इच्छुक उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावर (https://www.iiseradmission.in/) जाऊन तातडीने अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. IAT ही परीक्षा देशातील इंडियन इन्स्टिट्यूट्स ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्च (IISER) मध्ये प्रवेशासाठी घेतली जाते. बेरहामपूर, भोपाळ, कोलकाता, मोहाली, पुणे, तिरुवनंतपुरम आणि तिरुपती येथील IISER संस्थांमध्ये बीएस-एमएस (ड्युअल डिग्री) तसेच चार वर्षांच्या बीएस अभ्यासक्रमांसाठी या परीक्षेद्वारे प्रवेश दिला जातो. यंदा अभ्यासक्रमांच्या पर्यायांमध्ये वाढ करण्यात आली असून, डेटा सायन्स, भूविज्ञान, पर्यावरण विज्ञान यांसारख्या नव्या शाखांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच IISER भोपाळ आणि IISER तिरुपती येथे बीएस व बी.टेक अभ्यासक्रमांचीही संधी उपलब्ध आहे. यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनकेंद्रित वातावरणात विविध क्षेत्रांमध्ये करिअर घडविण्याचा मार्ग खुला झाला आहे.**

### रियलमी १६ फाईव्ह जी पुण्यात सादर



**पुणे (आरंभ पर्व) : भारतीय स्मार्टफोन बाजारपेठेत तरुण ग्राहकवर्गाला लक्ष्य करत रियलमीने 'रियलमी १६ फाइव्ह जी' हा नवीन स्मार्टफोन पुण्यात सादर केला. हा स्मार्टफोन पुण्यातील जंगली महाराज रोडवरील एसएस कम्युनिकेशन स्टोरमध्ये सादर करण्यात आला. सडपातळ 'एअर डिझाइन', उच्च क्षमतेची बॅटरी तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता-आधारित कॅमेरा प्रणाली या वैशिष्ट्यांमुळे हा स्मार्टफोन मध्यम किंमतीच्या श्रेणीत आपला वेगळेपणा दर्शवतो. या स्मार्टफोनमध्ये दुहेरी पन्नास मेगापिक्सेल पोर्ट्रेट कॅमेरा प्रणाली देण्यात आली असून त्यात समोरील तसेच मागील कॅमेऱ्यांचा समावेश आहे. नैसर्गिक त्वचा रंगसंगती, अचूक तपशील तसेच विविध प्रकाश परिस्थितींमध्ये संतुलित प्रतिमा देण्याची क्षमता यामुळे फोटोग्राफीचा अनुभव अधिक सक्षम होतो. जोडीलाच, 'रिअर सेल्फी मिरर' ही वैशिष्ट्यपूर्ण संकल्पना वापरकर्त्यांना मुख्य कॅमेऱ्याद्वारे सेल्फी टिपताना प्रतिमा थेट पाहण्याची सुविधा देते. तसेच, 'जेश्चर ओळख' व 'व्हॉइस काउंटडाऊन' यांसारख्या सुविधांमुळे वापर अधिक सुलभ होतो.**


## ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड, जि. पुणे.

**बी-१ पेपर नोटीस क्रमांक-१ सन २०१९-२०**

ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड, जि. पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी १ निविदापद्धतीने (दोन सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड, जि. पुणे यांच्याकडून दिनांक ०८.०४.२०२६ ते दिनांक १५.०४.२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक ०८.०४.२०२६ ते दिनांक १५.०४.२०२६ सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्विकारले जातील. सदर सिलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोईनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | वडवली पुनवर्सन अगंणवाडी दुरुस्ती | ३,००,०००/- | ०८.०४.२०२६ ते १५.०४.२०२६ | २३६/- | ३,०००/- |
| २) | मैदान तयार करणे | १,००,०००/- | | २३६/- | १,०००/- |
| ३) | सुशोभीकरण करणे | २,००,०००/- | | २३६/- | २,०००/- |
| ४) | अंतर्गत कॉंक्रीट करणे | ३,००,०००/- | | २३६/- | ३,०००/- |

अटी व शर्ती : १) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत दापोडी खाते क्र. ०२२००२५००००००१४ (PDCC बँक शाखा केडगाव) वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत दापोडी ग्रामनिधी खाते ०२२००२५००००००१४ (PDCC बँक शाखा केडगाव) खाते क्र. च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नवे धनादेश/ डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघ-डण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आधिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत दापोडी यांनी राखून ठेवला आहे.

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत दापोडी, ता. दौंड, जि. पुणे.




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. ०८ एप्रिल २०२६






# जैन, मराठा समाजाचे शांततेचे आवाहन

## पुण्यात घेतली संयुक्त पत्रकार परिषद; जैन मुनीने ताराराणींविषयी केले होते आक्षेपार्ह विधान




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुंबईत दोन जैन मुनींनी छत्रपती शिवाजी महाराज आणि राणी ताराबाई यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यांनंतर पुण्यात जैन आणि मराठा समाजातर्फे संयुक्त पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. समाजात कोणताही गैरसमज किंवा तणाव निर्माण होऊ नये, या उद्देशाने ही परिषद घेण्यात आली. या परिषदेत दोन्ही समाजांच्या प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, संबंधित वक्तव्यांचा जैन समाजाशी कोणताही संबंध नाही. ही विधाने वैयक्तिक असून राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. जैन समाजाने अशा वक्तव्यांचा तीव्र निषेध केला. युवक काँग्रेसचे अक्षय जैन यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण महाराष्ट्राचे आणि देशाचे प्रेरणास्थान आहेत. त्यांच्याविषयी प्रत्येकाच्या मनात आदर आणि अभिमान आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या वक्तव्यांना कोणताही पाठिंबा नसून ती संबंधित व्यक्तींची वैयक्तिक मते आहेत. समाजात तणाव निर्माण करण्याच्या प्रयत्नांना एकत्रितपणे विरोध केला पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

मराठा मोर्चाचे अनिकेत देशमाने यांनी जैन समाजाने घेतलेल्या स्पष्ट भूमिकेचे स्वागत केले. कोणत्याही गैरसमजाला वाव न देता शांतता आणि एकता टिकवणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भावना तीव्र असल्या तरी संयम राखणे गरजेचे असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

जितो पुणेचे लक्ष्मीकांत खाबिया यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य अतुलनीय असल्याचे सांगितले. त्यांचे मोजमाप करण्याचा अधिकार कोणालाही नाही. जैन समाज नेहमीच शांतता, सहिष्णुता आणि परस्पर आदर यांचा पुरस्कार करतो, त्यामुळे अशा वक्तव्यांना समाजात स्थान नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेत दोन्ही समाजांनी एकत्रितपणे महाराष्ट्रातील एकता, बंधुता आणि परस्पर सन्मानाची परंपरा जपण्याचा निर्धार व्यक्त केला. अफवा आणि चुकीच्या माहितीपासून दूर राहून संवाद आणि संयमाच्या माध्यमातून सामाजिक सलोखा टिकवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

या परिषदेला अक्षय जैन, अनिकेत देशमाने, लक्ष्मीकांत खाबिया, दिनेश सुतार, मिलिंद फडे, सुधीर मते, राजेंद्र सुराणा, नितीन जैन, अनिल भोसुरे, गोविंद पवार, समाधान नागवे, माऊली दुचाल, अर्चना शहा, श्रीपाल ललवाणी, दिलीप खोबरे, रमेश पाटील, डॉ. सुजाता बरगळे, अनिल भंडारी, अँडी जय कोठारी आदी मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘राया’चे दिमाखदार उद्घाटन; डिझायनर एथनिक वेअरचा नवा पर्याय

पुणे (आरंभ पर्व) : शहरातील गजबजलेल्या लक्ष्मी रोड परिसरात ‘राया’ या नावाजलेल्या Men’s Designer Ethnic Wear शोरूमचा दिमाखदार शुभारंभ उत्साहात पार पडला. हुजूरपागा शाळेजवळ आयोजित या उद्घाटन सोहळ्यात मान्यवरांची उपस्थिती लाभली. या शोरूमचे उद्घाटन अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील आणि उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, तसेच जयहिंद ग्रुपचे चेअरमन नागराज जैन, मुख्य संचालक दिनेश जैन आणि संचालक प्रेषित जैन उपस्थित होते. आधुनिक आणि पारंपरिक पोशाखांचा संगम असलेले ‘राया’ हे शोरूम आता पुणेकरांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. येथे शेरवानी, बंदगला, कुर्ता, डिझायनर सूट, इंडो-वेस्टर्न अशा विविध प्रकारच्या समारंभिक पोशाखांची समृद्ध श्रेणी उपलब्ध आहे. या स्टोअरची खासियत म्हणजे ग्राहकांना मिळणारा वैयक्तिक अनुभव. ‘राया’मध्ये असलेल्या फॅब्रिक स्टुडिओमुळे ग्राहकांना आपल्या पसंतीनुसार कपडे शिवून घेण्याची सुविधा उपलब्ध असून, प्रत्येक पोशाख परफेक्ट फिट आणि वैयक्तिक शैलीनुसार तयार केला जातो. “पुणेकरांनी या वैविध्यपूर्ण वस्त्रदालनाला भेट देऊन मनपसंत पोशाखांची खरेदी करत एक अनोखा अनुभव घ्यावा,” असे आवाहन संचालक प्रेषित जैन यांनी केले.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर उपाध्यक्षपदी पोपटराव खेडेकर यांची नियुक्ती



धायरी (आरंभ पर्व) : पुणे शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहर उपाध्यक्षपदी ज्येष्ठ नेते,नऱ्हे गावचे माजी सरपंच पोपटराव खेडेकर यांची निवड करण्यात आली. राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली तसेच प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आल्याची माहिती पक्षाच्या वतीने देण्यात आली पक्षाचे शहराध्यक्ष सुभाष जगताप यांच्या हस्ते खेडेकर यांना निवडपत्र प्रदान करण्यात आले. या वेळी शहराध्यक्ष माजी आमदार सुनील टिंगरे, विरोधी पक्षनेते ॲड. निलेश कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच विविध पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी खेडेकर यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी राजाभाऊ वाडेकर, बापूसाहेब ठोंबरे, हरीभाऊ खेडेकर, आप्पासाहेब नातू, अजित कुंटे, नारायण झगडे, प्रदीप कुंटे, प्रवीण कुंटे, सदाशिव कुंटे, शिवाजी सावंत आदी ग्रामस्थ व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नऱ्हे गावचे माजी सरपंच म्हणून काम करताना लोकाभिमुख भूमिका बजावणारे पोपटराव खेडेकर यांनी आपल्या निवडीनंतर बोलताना सांगितले की, आमच्या प्रभागातील विविध प्रलंबित विकासकामांना गती देण्यासाठी तसेच नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडवण्यासाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करणार आहोत. तसेच पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटनात्मक बांधणीवर भर दिला जाईल, असेही त्यांनी नमूद केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे विचार व धोरणे समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त करत, सर्वसामान्यांच्या हितासाठी सातत्याने काम करण्याचा निर्धार खेडेकर यांनी यावेळी व्यक्त केला.



### शिवाभाऊ पासलकर यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

सिंहगड रोड (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राज्यातील “मिसिंग ग्रुप”चे संस्थापक अध्यक्ष शिवा भाऊ पासलकर यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन कार्यक्रम उत्साहात पार पडला. सिंहगड रोड येथील त्यांच्या कार्यालयासमोर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. ह्यावेळी उपस्थितांनी शिवाभाऊ पासलकर यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. विशेषतः हरवलेल्या व्यक्तींना त्यांच्या कुटुंबियांसोबत पुन्हा एकत्र आणण्याचे त्यांनी घेतलेले ध्येय आणि त्यासाठी केलेले अथक प्रयत्न याबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक करण्यात आले. हजारो हरवलेल्या व्यक्तींना शोधून त्यांना सुखरूप घरी पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांच्या माध्यमातून घडत असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सचिन तावरे, पोलीस निरीक्षक वैशाली पाटील, नगरसेवक सचिन मोरे, चित्रपट अभिनेता अक्षय टंगसाळे, केतन मिसाळ, चित्रपट अभिनेत्री श्रेया पासलकर, आबासाहेब हरपळे, चंदन कड, राजू चव्हाण, प्रेम करंजकर, संजय बालगुडे, विष्णू घोरपडे प्रदीप लडकत, राहुल जाधव दादासाहेब मोरे, सामाजिक कार्यकर्ते काशेवाडी, प्रवीण मोरे, संतोष मोरे, सुमित चव्हाण अमर नलावडे गणेश पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## प्रा. डॉ. भिमराव मोरे यांना राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार




**दौंड (दै. आरंभ पर्व)**

द युवा ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने महाराष्ट्र गौरव सन्मान-२०२६ चा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा मंगळवार ३१ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वा. पंढरपूर येथील संतराज कार्यालयात संपन्न झाला. या सोहळ्यात राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदरचा पुरस्कार सोहळा ह.भ.प. सावता महाराज वसेकर (१९ वे वशंज श्री संत शिरोमणी सावता महाराज) यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी द युवा ग्रामीण पत्रकार संघ संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख, राज्य सचिव बाळासाहेब कोठुळे, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष शकील मणियार, वनरक्षक अधिकारी अनिता शिंदे, ॲड . प्रणव परिचारक, आदी मान्यवर उपस्थित होते. प्रा. डॉ. भिमराव मोरे यांनी रिक्षा चालक व मालकांच्या जीवनावर पीएच्. डी करून राज्यात नावलौकिक प्राप्त केला आहे. तसेच डॉ.मोरे यांनी आपल्या दौंड रिक्षा महासंघाच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबवले आहेत एवढेच नव्हे तर, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत, गरजू कुटुंबाला आर्थिक सहाय्य तसेच समाजाच्या जनजागृतीचे विविध कार्यक्रम आयोजित करून त्यांनी समाजात सकारात्मक बदल घडवून आणला आहे.

## कुस्ती आखाड्यातील 'घोटवडे पॅटर्न'ची संपूर्ण जिल्ह्यात चर्चा

### शिस्तबद्ध आणि आदर्श मैदानाचे उत्तम उदाहरण!



**मुळशी (पुणे) (दै. आरंभ पर्व)**

मुळशी तालुक्यातील घोटवडे गावाने आपल्या प्रदीर्घ कुस्ती परंपरेचा वारसा जपत हनुमान जयंती आणि ग्रामदैवत रोकडेश्वर व बहिरदेव मारुती उत्सवानिमित्त भव्य निकाली कुस्त्यांचे मैदान आयोजित केले होते. या मैदानाने आपल्या शिस्तबद्ध नियोजनामुळे संपूर्ण पुणे जिल्ह्यात 'घोटवडे पॅटर्न' म्हणून एक नवी ओळख निर्माण केली आहे.

या चित्तथरारक कुस्ती मैदानात सुमारे ७० निकाली कुस्त्या झाल्या. ११ लाख रुपयांच्या एकूण बक्षिसांच्या या मैदानात महाराष्ट्रातील नामांकित पैलवानांनी हजेरी लावली होती.

प्रथम क्रमांकाची कुस्ती: अभिजीत भोईर विरुद्ध आशिष वावरे यांच्यात ५१ हजार रुपये इनामासाठी अटीतटीची लढत झाली. यात पैलवान अभिजीत भोईर याने विजय संपादन केला.

द्वितीय क्रमांकाची कुस्ती: ५१ हजार रुपये इनामासाठी झालेल्या लढतीत पैलवान आकाश रानवडे याने जीवन घोडके याच्यावर मात केली.

प्रेक्षणीय कुस्त्या: पैलवान सुरज तनपुरे आणि वेदांत पवार यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांना अस्मान दाखवत प्रेक्षकांची मने जिंकली.

घोटवडे गावच्या या मैदानाने काही आदर्श पायंडे घालून दिले आहेत, ज्याची सध्या सर्वत्र चर्चा होत आहे:

पुरस्कारदात्यांचा सन्मान: ज्या कुस्तीप्रेमींनी कुस्ती पुरस्कृत केली, त्यांना मानाचा फेटा बांधून वाजत-गाजत आखाड्यापर्यंत आणले जाते आणि त्यांच्याच हस्ते कुस्ती लावली जाते.

शिस्तबद्ध व्यवस्था: मैदानात प्रेक्षकांसाठी बसण्याची उत्तम सोय आणि कोणताही गोंधळ होणार नाही याची विशेष काळजी घेतली जाते.

स्थानिक पैलवानांना व्यासपीठ: गावातील जुन्या जाणत्या आणि अनुभवी पैलवानांना 'पंच' म्हणून काम करण्याची संधी दिली जाते.

निकाली कुस्त्यांवर भर: हे मैदान केवळ निकाली कुस्त्यांसाठी प्रसिद्ध आहे. बराच वेळ निर्णय न लागल्यास गुणांवर आधारित निकाल देऊन कुस्ती निकाली काढली जाते.

सुसूत्र नियोजन: व्यासपीठ, माईक व्यवस्था आणि कुस्ती निवेदक यांच्यात उत्तम समन्वय राखला गेल्याने मैदानाचा दर्जा उंचावतो.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून घोटवडे गावाने कुस्तीची ही परंपरा जोपासली आहे. मागील तीन वर्षांपासून ग्रामदैवताच्या मंदिराचे काम सुरू असतानाही, गावाने कुस्तीचा हा वसा खंडित होऊ दिला नाही.

"तरुण पिढी निरोगी राहावी, त्यांना व्यायामाची आवड निर्माण व्हावी आणि आपल्या तांबड्या मातीतील हा रांगडा खेळ जिवंत राहावा, हाच आमचा उद्देश आहे," अशी माहिती पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे सदस्य पै. शरद गोडांबे यांनी दिली. या मैदानाच्या यशस्वी आयोजनासाठी घोटवडे गावातील सर्व पैलवान मंडळी, वस्ताद आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले. शिस्त आणि परंपरेचा हा मेळ पाहता, घोटवडे गावचे कुस्ती मैदान आता महाराष्ट्रातील एक आदर्श मैदान म्हणून नावारूपास आले आहे.

## धर्मावर देश उभा करायचा की संविधानावर?




**(दै. आरंभ पर्व)**

**आजच्या सामाजिक आणि राजकीय वातावरणात काही विधानं वारंवार ऐकू येतात. “फलाणा समाजाला देशातून बाहेर काढा”, “देशाला अमुक धर्माचा दर्जा द्या”. ही वाक्यं केवळ भावनिक प्रतिक्रिया नसून समाजातील वाढत्या ध्रुवीकरणाची लक्षणं आहेत. या पार्श्वभूमीवर प्रश्न उभा राहतो. भारताची ओळख नेमकी कशावर उभी आहे?**

भारतीय राज्यघटना देशाला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य म्हणून परिभाषित करते. धर्मनिरपेक्षता म्हणजे कोणत्याही धर्माला विशेष स्थान देणे नव्हे, तर सर्व धर्मांना समान वागणूक देणे. त्यामुळे कोणत्याही एका धर्माच्या आधारे राष्ट्राची पुनर्व्याख्या करण्याचा विचार हा घटनात्मक चौकटीला छेद देणारा ठरतो. एखाद्या समुदायाला देशाबाहेर हाकलण्याची भाषा ही केवळ राजकीय विधान म्हणून पाहता येत नाही. अशा विचारांतून समाजात अविश्वास वाढतो, तणाव निर्माण होतो आणि दीर्घकालीन सामाजिक विघटनाची शक्यता वाढते. इतिहासात धर्माच्या आधारावर झालेल्या विभाजनाचे परिणाम देशाने अनुभवले आहेत. त्यामुळे अशा विचारांकडे केवळ भावनेने नव्हे, तर शहाणपणाने पाहण्याची गरज आहे.

लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला समान अधिकार आणि संरक्षण दिलेले आहे. कायद्याचे राज्य हेच कोणत्याही राष्ट्राचे मूलभूत तत्त्व असते. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीवर किंवा समूहावर कारवाई करायची असल्यास ती त्यांच्या कृतीच्या आधारेच केली जाऊ शकते. धर्माच्या आधारे नव्हे. हीच खरी न्यायव्यवस्था आहे. अशा संवेदनशील मुद्द्यांमध्ये राजकारणाचाही प्रभाव दिसून येतो. समाजातील मतभेद तीव्र करून त्यातून राजकीय लाभ मिळवण्याचा प्रयत्न अनेकदा केला जातो. मात्र यामुळे मूलभूत प्रश्न रोजगार, शिक्षण, आरोग्य हे मागे पडतात. परिणामी सामान्य नागरिकांचे प्रश्न कायमच राहतात.

भारताची खरी ताकद ही त्याच्या विविधतेत आहे. वेगवेगळे धर्म, भाषा, संस्कृती यांचा संगम असलेला हा देश एकात्मतेच्या धाग्याने बांधलेला आहे. या विविधतेलाच जर धोक्यात आणले, तर देशाची ओळखच धूसर होईल.

म्हणूनच आज गरज आहे ती विभाजनाच्या भाषेपेक्षा संवादाच्या संस्कृतीची. मतभेद असू शकतात, पण ते लोकशाही मार्गाने सोडवणे आवश्यक आहे. कोणताही निर्णय हा संविधानाच्या चौकटीत राहूनच घेतला गेला पाहिजे. शेवटी प्रश्न एकच देशाला रागाच्या भावनेवर चालवायचे की नियम आणि न्यायाच्या तत्त्वांवर? उत्तर स्पष्ट आहे. भारताची वाटचाल ही एकतेकडे आणि समानतेकडेच असली पाहिजे.

## ग्रामपंचायत नानगाव, ता. दौंड, जि. पुणे

**बी-१ पेपर नोटीस क्रमांक-१ सन २०२५-२६**

ग्रामपंचायत नानगाव, ता. दौंड, जि. पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा बी १ निविदापद्धतीने (दोन सिलबंद लिफाफा पद्धतीने) जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागवण्यात येत आहेत. कोऱ्या निविदेचा नमुना ग्रामपंचायत नानगाव, ता. दौंड, जि. पुणे यांच्याकडून दिनांक ०८.०४.२०२६ ते दिनांक १४.०४.२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक ०८.०४.२०२६ ते दिनांक १४.०४.२०२६ सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्विकारले जातील. सदर सिलबंद निविदा मासिक सभे दिवशी/ग्रामपंचायत सोईनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) | हौसीराम खोमणे ते सूरज जाधव गटर करणे | ३,००,०००/- | ०८.०४.२०२६ ते १४.०४.२०२६ | २३६/- | ३,०००/- |
| २) | पाणी पुरवठा योजना देखभाल | २,००,०००/- | | २३६/- | २,०००/- |
| ३) | सांडपाणी व्यवस्थापन करणे | २,५०,०००/- | | २३६/- | २,५००/- |
| ४) | रामभाऊ ढमे ते नाईकवाडा बंदिस्त गटर करणे | २,५०,०००/- | | २३६/- | २,५००/- |
| ५) | राजेंद्र अहिवळे ते लक्ष्मी माता मंदिर गटर करणे | ४,५२,८९०/- | | २३६/- | ४,५२८/- |
| ६) | वडगाव रस्ता ते महादेव मंदिर बंदिस्त गटर करणे | ४,५२,८९०/- | | २३६/- | ४,५२८/- |
| ७) | अमोनिमाळ शाळा परिसर सुधारणे | २,००,०००/- | | २३६/- | २,०००/- |
| ८) | गावठाण अंतर्गत रस्ता तयार करणे | ३,००,०००/- | | २३६/- | ३,०००/- |
| ९) | समाज मंदिर परिसर सुधारणे | १,५०,०००/- | | २३६/- | १,५००/- |
| १०) | ग्रामपंचायत सुधारणा (रंगकाम) | १,५०,०००/- | | २३६/- | १,५००/- |
| ११) | गणेश रोड शाळा टॉयलेट दुरुस्त करणे | २,००,२९२/- | | २३६/- | २,००२/- |
| १२) | गुंड वस्ती शाळा पाणी पुरवठा | १,१०,४६७/- | | २३६/- | १,१०४/- |

अटी व शर्ती : १) कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. २) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत नानगाव खाते क्र. १२९००१६०००००००९ (PDCC बँक शाखा नानगाव) वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कमी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३) यापूर्वी केलेल्या कामांचे पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत नानगाव ग्रामनिधी खाते १२९००१६०००००००९ (PDCC बँक शाखा नानगाव) खाते क्र. च्या खाती भरल्याची पावती जोडण्यात यावी किंवा ग्रामपंचायत नवे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निविदेचा विचार केला जाणार नाही. ५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघ-डण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आधिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत नानगाव यांनी राखून ठेवला आहे.

ग्रामसेवक सरपंच
ग्रामपंचायत नानगाव, ता. दौंड, जि. पुणे.


## थोडक्यात पण महत्वाचे



### भाजपाच्या वर्धापन दिनानिमित्त सफाई कामगारांचा सन्मान

पुणे (आरंभ पर्व) : भारतीय जनता पार्टीच्या ४६ व्या वर्धापन दिनानिमित्त खडकवासला विधानसभा क्षेत्रातील धायरी-शिवणे मंडलाच्या वतीने पुणे महापालिकेत काम करणाऱ्या सफाई कामगारांचा सन्मान करण्यात आला. समाजासाठी अत्यंत महत्त्वाची सेवा देणाऱ्या या कामगारांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात सफाई कर्मचारी पुरुष व महिलांना पेढे वाटप करून तसेच गुलाब पुष्प देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. शहर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी हे कर्मचारी दररोज कठीण परिस्थितीत काम करतात. पाऊस, उन्हाळा किंवा इतर अडचणी असल्या तरी ते आपले काम प्रामाणिकपणे करत असतात. त्यांच्या या निष्ठेची दखल घेत पक्षाच्या वतीने त्यांचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमावेळी उपस्थित मान्यवरांनी सांगितले की, सफाई कामगार हे शहराचे खरे हिरो आहेत. त्यांच्या मेहनतीमुळेच आपल्याला स्वच्छ वातावरण मिळते. त्यामुळे त्यांच्या कामाचा सन्मान करणे ही आपली जबाबदारी आहे. या प्रसंगी विजय मते (मंडल अध्यक्ष), रमेशबापू गायकवाड (उपाध्यक्ष, ओबीसी मोर्चा पुणे शहर), अशोक मते (उपाध्यक्ष, खडकवासला), दत्ताभाऊ कोल्हे (महाराष्ट्र प्रदेश सचिव, ओबीसी मोर्चा), अनिल मते (उपजिल्हाध्यक्ष), किरण हगवणे (सरचिटणीस), सुप्रिया कळमकर (सोशल मीडिया), संतोष मते (वाहतूक आघाडी उपाध्यक्ष), अभिजीत मते, श्लोक मते तसेच पुणे महापालिकेचे अनेक सफाई कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम साध्या आणि उत्साही वातावरणात पार पडला. उपस्थितांनी सफाई कामगारांना पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या.

### TECNO SPARK 50 5G उपलब्ध




पुणे (आरंभ पर्व) : TECNO SPARK 50 5G आजपासून भारतात विक्रीसाठी उपलब्ध झाला आहे. 4GB + 128GB व्हेरिएंटची किंमत ₹16,999 असून 6GB + 128GB मॉडेल ₹18,999 मध्ये उपलब्ध आहे. हा स्मार्टफोन Flipkart तसेच देशभरातील रिटेल स्टोअर्समध्ये त्वरित खरेदी करता येतो. याशिवाय 8 महिन्यांपर्यंत नो-कॉस्ट EMI पर्यायही उपलब्ध आहे. TECNO Spark 50 5G हा सतत चार्जर शोधण्याच्या त्रासाला कंटाळलेल्या वापरकर्त्यांसाठी खास बनवला आहे. यामध्ये 6500mAh ची मोठी बॅटरी देण्यात आली आहे, जी दिवसभर जोरदार वापरातही टिकते. तसेच मिलिटरी-ग्रेड ड्रॉप प्रोटेक्शन आणि स्प्लॅश व डस्ट रेटिंगमुळे हा फोन पडणे किंवा अचानक पावसात भिजणे अशा परिस्थितीतही सुरक्षित राहतो. डिझाइनच्या बाबतीत, हा फोन नैसर्गिक रंगांपासून प्रेरित आहे आणि टिकाऊपणासह आकर्षक लुक देतो. तो Fantasy Purple, Mint Green, Champagne Gold आणि Ink Black या चार रंगांमध्ये उपलब्ध आहे. 120Hz डिस्प्लेमुळे स्क्रोलिंग आणि ॲप्समधील स्विचिंग खूपच स्मूद आणि प्रतिसादक्षम वाटते. नेटवर्क कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी, TECNO Spark 50 5G मध्ये स्मार्ट अँटेना टेक्नॉलॉजी वापरली आहे, ज्यामुळे कमी नेटवर्क असलेल्या ठिकाणीही सिग्नल चांगला मिळतो. तसेच यात काही उपयुक्त फीचर्सही दिले आहेत, जसे की ॲक्टिव्ह नॉईज कॅन्सलेशन, WhatsApp साठी सहाय्यक, आणि फोटो सुधारण्यासाठी किंवा मजकूर तयार करण्यासाठी AI टूल्स.

### दोन कलेक्टर घडविणारी शेतकरी माता : हभप गणेश महाराज फरताळे



उरुळी कांचन (आरंभ पर्व) : कपाळावर ठसठशीत कुंकू, अंगावर साधं लुगडं आणि कष्टाने रापलेलं शरीर... पाहता साधी वाटणारी ही महिला प्रत्यक्षात असामान्य कर्तृत्वाची धनी होती. आपल्या तिन्ही मुलांना शिक्षणाच्या जोरावर उच्च पदावर पोहोचवणारी ही आदर्श माता म्हणजे बीड जिल्ह्यातील ताडसोना येथील आसराबाई मुंढे होत्या. त्यांच्या निधनाने एका प्रेरणादायी जीवनप्रवासाला विराम मिळाला आहे. अत्यंत साध्या शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या आसराबाई मुंढे यांनी आयुष्यभर कष्ट करत आपल्या मुलांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. घरची आर्थिक परिस्थिती मर्यादित असतानाही त्यांनी कधीही मुलांच्या शिक्षणात तडजोड केली नाही. "शिक्षण आणि प्रामाणिकपणा माणसाला मोठं बनवतात" हा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यांच्या याच संस्कारांमुळे त्यांच्या तिन्ही मुलांनी आयुष्यात मोठी झेप घेतली. त्यांचे सुपुत्र तुकाराम मुंढे आणि अशोक मुंढे यांनी प्रशासनात उच्च पदे भूषवली, तर तिसरा मुलगा प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. विशेष म्हणजे, तुकाराम मुंढे हे प्रामाणिक, धाडसी आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून राज्यभर ओळखले जातात. त्यांनी ज्या ठिकाणी काम केले, तेथे शिस्त, पारदर्शकता आणि भ्रष्टाचाराविरुद्ध कठोर भूमिका घेतली. त्यामुळे सामान्य नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी विश्वास निर्माण झाला. अशोक मुंढे यांनीही आपल्या कार्यातून आईच्या संस्कारांचा मान राखत प्रशासनात उल्लेखनीय योगदान दिले. या यशामागे कोणताही मोठा वारसा किंवा संपत्ती नव्हती; होते ते फक्त आईचे कष्ट, संस्कार आणि शिक्षणावर असलेला अढळ विश्वास. हभप गणेश महाराज फरताळे यांनी या मातोश्रींच्या कार्याचा गौरव करताना म्हटले की, "आसराबाई मुंढे या खऱ्या अर्थाने समाजासाठी आदर्श ठरल्या. त्यांनी केवळ आपल्या कुटुंबालाच नव्हे, तर संपूर्ण समाजाला शिक्षणाची दिशा दिली." अशा या कर्तृत्ववान शेतकरी मातेला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

### अखेर रिंगरोड प्रकल्पाला गती

पिंपरी (आरंभ पर्व) : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) महत्त्वाकांक्षी इनर रिंगरोड प्रकल्पाला आता वेग आला आहे. त्यासाठी ११ गावांतील १२० हेक्टर जमिनींची संयुक्त मोजणी पूर्ण झाली असून जमिनींचे भरपाई दर निश्चित केले आहेत. या प्रकल्पातील सोळू ते वडगाव शिंदे या पहिल्या टप्प्यातील भूसंपदनासाठी पीएमआरडीएने ११३ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली असून भूसंपादन प्रक्रिया लवकरच सुरू होणार आहे. जिल्हा प्रशासनाने सर्वेक्षण, मोजमाप व भरपाईचा अहवाल तयार करून तो पीएमआरडीएकडे सादर केला.


# भाजपचा वटवृक्ष कार्यकर्त्यांच्या संघर्षातून उभा

## "राष्ट्र प्रथम' मंत्रासह भाजपाचा विस्तार – पक्षाच्या ४७व्या वर्षात प्रवेशानिमित्त प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची प्रतिक्रिया"

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सोमवारी भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिन आहे. ६ एप्रिल १९८० रोजी पक्षाची स्थापना झाली. पक्षाने ४६ वर्षे पूर्ण करून ४७व्या वर्षात पदार्पण केले आहे. या निमित्ताने महाराष्ट्र भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी लेख लिहून आपले विचार मांडले आहेत. सामान्य कार्यकर्ता ते पक्षाचा प्रदेशाध्यक्ष हा प्रवास फक्त भाजपसारख्या संघटनेतच शक्य असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे लिहिले की, विचारधारेच्या घट्ट मुळांनी मातीत रुजलेला आणि कार्यकर्त्यांच्या संघर्षातून उभा राहिलेला भारतीय जनता पक्षाचा विशाल वटवृक्ष आज ४७व्या वर्षात पदार्पण करत आहे. ६ एप्रिल १९८० रोजी रोवलेले हे बीज आज सुमारे २५ कोटींहून अधिक कार्यकर्त्यांच्या मेहनतीने संपूर्ण देशभर विस्तारले आहे.

रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचा कार्यकर्ता, भाजयुमोचा उपाध्यक्ष, नगरसेवक, आमदार, कॅबिनेट मंत्री आणि आता प्रदेशाध्यक्ष या नात्याने जेव्हा मी पक्षाच्या इतिहासाकडे पाहतो, तेव्हा मला जाणवतं की जसे विचारधारेने एक एक कार्यकर्ते घडवले आणि त्याचप्रमाणे असंख्य ध्येयवादी कार्यकर्त्यांनी त्यांच्या रक्ता-घामाने गुरुदक्षिणा म्हणून पक्षाला घडवले.



जेव्हा नेहरू-गांधींची अल्पसंख्याक-केंद्रित समाजवादी विचारसरणी आणि साम्यवादी चळवळींचा जागतिक प्रभाव होता, त्या काळात जनसंघाच्या माध्यमातून बहुसंख्य पण वंचित समाजाला केंद्रस्थानी ठेवण्याचे आणि प्रवाहाच्या विरुद्ध पोहण्याचे धैर्य डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी, पंडित दीनदयाल उपाध्याय आणि अटल बिहारी वाजपेयी यांसारख्या नेत्यांनी दाखवले. त्यांची दूरदृष्टी आजही आमच्यासाठी मार्गदर्शक दीपस्तंभ आहे.

### ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे वाटचाल

**भारताला ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनवणे आणि त्यात महाराष्ट्राचा १ ट्रिलियन डॉलरचा वाटा सुनिश्चित करणे, यावर विशेष भर दिला जात आहे. या योजना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे आणि गावपातळीवरील समस्या शासनापर्यंत नेणे, हे प्रत्येक कार्यकर्त्याचे कर्तव्य आहे. हाच 'अंत्योदय'चा खरा अर्थ आहे. जेव्हा प्रत्येक भाजप कार्यकर्ता या भावनेने काम करेल, तेव्हाच 'विकसित भारत'चे स्वप्न साकार होईल आणि विकसित महाराष्ट्राशिवाय ते शक्य नाही.**

वैचारिक पाया आणि नेतृत्वाची परंपरा लाभलेल्या भाजपच्या या प्रवासात अनेक ऋषितुल्य नेत्यांचे मोठे योगदान राहिले आहे. महाराष्ट्र भाजपाचाच विचार करायचा झाला तर १९८० मध्ये उत्तमराव पाटील यांनी पहिले प्रदेशाध्यक्ष म्हणून पक्षाचा पाया रचला. त्यानंतर गोपीनाथ मुंडे यांनी पक्षाला गावागावात नेले आणि बहुजन व ओबीसी समाजाला मुख्य प्रवाहात आणत अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा दिली. १९९५ मध्ये काँग्रेसची सत्ता हटवण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. प्रा. ना. स. फरांदे यांनी पक्षाला वैचारिक बळ दिले, तर सूर्यभान वहाडणे पाटील यांनी शिस्तबद्ध नेतृत्वातून संघटना मजबूत केली. भाऊसाहेब फुंडकर यांनी शेतकऱ्यांसाठी लढा देत पक्षाला शेतशिवारापर्यंत पोहोचवले. प्रमोद महाजन यांच्या निधनानंतर नितीन गडकरी यांनी कार्यकर्त्यांना सावरत संघटनेला नवी ऊर्जा दिली.

सुधीर मुनगंटीवार यांनी जनसंपर्काचा नवा अध्याय सुरू केला. २०१३ मध्ये देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने मोठी झेप घेतली आणि प्रदेशाध्यक्षपदावरून थेट मुख्यमंत्रीपदावर जाण्याचा अनोखा विक्रम घडला. त्यानंतर रावसाहेब दानवे, चंद्रकांत पाटील आणि चंद्रशेखर बावनकुळे यांनी संघटना आणि सरकार यांच्यात उत्तम समन्वय साधत पक्षाला शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवले.

कधी 'शेटजी-भटजी'ची पार्टी म्हणून टीका झालेल्या भाजपने ४६ वर्षांत महाराष्ट्रात ११ बहुजन समाजातील प्रदेशाध्यक्ष दिले, जे जातीय राजकारण करणाऱ्यांना ठोस उत्तर आहे. आज एक कार्यकर्ता म्हणून प्रदेशाध्यक्षाची जबाबदारी सांभाळताना, मला अभिमान वाटतो की सामान्य कार्यकर्त्यापासून या पदापर्यंत पोहोचणे केवळ भाजपातच शक्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांतील यश हे केवळ आकडे नसून जनतेचा विश्वास असल्याचे त्यांनी नमूद केले.

भाजप ही केवळ बॅनर आणि सभांची संघटना नसून विचारधारेवर उभे असलेले कार्यकर्ते हीच तिची खरी ताकद आहे. 'भारतीयत्व म्हणजेच राष्ट्रीयत्व' हा विचार आम्ही तळागाळापर्यंत पोहोचवला आहे. आम्हाला अनेकदा अति राष्ट्रवादी म्हटले जाते; पण देशाबद्दल अभिमान बाळगणे हा दोष असेल, तर तो आम्ही आनंदाने स्वीकारू. 'राष्ट्र प्रथम'ही आमच्या विचारधारेची मूळ भूमिका आहे. काळानुसार तंत्रज्ञानाचा स्वीकार करत भाजप एक 'टेक-फ्रेंडली' संघटना बनत आहे, ज्यामुळे बूथ स्तरापर्यंत कार्यकर्त्यांशी तात्काळ संपर्क साधणे शक्य झाले आहे. केंद्रात पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.

## 'इंट्रा ईव्ही' पिकअप लाँच; ११.९५ लाखांपासून किंमत

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

टाटा मोटर्सने भारतातील इलेक्ट्रिक व्यावसायिक वाहन क्षेत्रात आणखी एक मोठी झेप घेत 'इंट्रा ईव्ही' पिकअप लाँच केली आहे. ११.९५ लाख रुपये (एक्स-शोरूम) या प्रारंभिक किमतीत उपलब्ध असलेली ही पिकअप वाहन मालवाहतुकीसाठी अधिक कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक पर्याय म्हणून सादर करण्यात आली आहे. कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक व सीईओ गिरीश वाघ यांनी सांगितले की, हरित गतीशीलतेच्या दिशेने टाटा मोटर्सची कटिबद्धता कायम असून विविध व्यावसायिक गरजांसाठी शाश्वत उपाय देण्यावर कंपनीचा भर आहे. इंट्रा ईव्ही पिकअपमध्ये १,७५० किलो पेलोड क्षमता आणि सुमारे १० फूट २ इंच लांबीचा लोड बॉडी पर्याय देण्यात आला आहे. त्यामुळे ई-कॉमर्स, एफएमसीजी, दुग्ध व्यवसाय, एलपीजी वितरण आणि कचरा व्यवस्थापन अशा



विविध क्षेत्रांसाठी हे वाहन उपयुक्त ठरणार आहे. ७२ kW मोटरमुळे २३० Nm टॉर्क निर्माण होतो, ज्यामुळे पूर्ण भार असतानाही वाहन सहज चालते. या पिकअपमध्ये २८.२ kWh क्षमतेची IP67 प्रमाणित बॅटरी देण्यात आली असून एका चार्जवर सुमारे २११ किमीची रेंज मिळते. फास्ट चार्जिंग सुविधेमुळे १० ते ८० टक्के चार्जिंग केवळ ५५ मिनिटांत पूर्ण होते.

बॅटरीवर ६ वर्षे किंवा २ लाख किमीची वॉरंटी देण्यात आली आहे. या वाहनात इलेक्ट्रॉनिक ब्रेकिंग सिस्टम, थ्री-लेव्हल रिजनरेटिव्ह ब्रेकिंग आणि टाटा फ्लीट एज टेक्नोलॉजी देण्यात आली आहे.

## मयूर दौंडकर यांचा आम आदमी पक्षाचा राजीनामा


### भाजपामध्ये जाहीर प्रवेश

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

आम आदमी पार्टीचे माजी युवक प्रदेशाध्यक्ष व खेड तालुक्यातील युवा नेते मयूर मगन दौंडकर यांनी आपल्या पदाचा राजीनामा देत भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला.

भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत तसेच भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांच्या हस्ते पक्षप्रवेश कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

यावेळी पक्ष प्रवक्ते नवनाथ बन, आमदार निरंजन डावखरे, आमदार अभिमन्यू पवार तसेच कार्यालयीन प्रभारी रवींद्र अनासपुरे आदी मान्यवर उपस्थित होते. मयूर दौंडकर यांनी गेल्या सात वर्षांपासून आम आदमी पार्टीमध्ये सक्रिय राजकीय कार्य करत युवा संघटन उभारणी, जनआंदोलन, संघटनात्मक विस्तार तसेच विविध सामाजिक व जनतेच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम केले. युवक प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी राज्यभर युवकांना संघटित करण्याची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. भाजपा पक्षप्रवेशानंतर माध्यमांशी संवाद साधताना दौंडकर म्हणाले की, "देशहित, विकास आणि सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी कार्य करणारी भारतीय जनता पार्टीची विचारधारा मला प्रेरणादायी वाटते. येणाऱ्या काळात भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून युवकांना संघटित करणे, स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी सक्रिय भूमिका घेणे आणि जनतेच्या विकासासाठी सातत्याने काम करण्याचा माझा संकल्प आहे." तसेच पुढे बोलताना



ते म्हणाले की, महाराष्ट्रातील युवक, शेतकरी, उद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर संघटनात्मक पातळीवर काम करत विकासाभिमुख राजकारण अधिक मजबूत करण्यावर भर दिला जाईल. त्यांच्या या प्रवेशाचे युवा पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्वागत केले आहे.

## उद्योगांचे विकेंद्रीकरण ग्रामीण भागात व्हावे

### उद्योजक भरत गीते : महाराष्ट्र उद्योगभूषण पुरस्काराने सन्मान व प्रकट मुलाखत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"आत्मनिर्भर भारतासाठी योगदान देण्याच्या उद्देशाने जर्मनीहून भारतात परतलो आणि उद्योग सुरु केला. भारतीय बनावटीचे उत्पादन करून भारत आत्मनिर्भर होण्यात, तसेच युवापिढीला चांगले शिक्षण मिळावे, यासाठी शिक्षण क्षेत्रात योगदान देण्यासाठी कटिबद्ध आहे. महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी उद्योगांचे ग्रामीण भागात विकेंद्रीकरण व्हायला हवे. गुणवत्ता आणि नीतिमत्ता हेच माझ्या यशाचे खरे साथीदार आहेत," असे प्रतिपादन अल्युमिनियम मॅन ऑफ इंडिया, तौराल इंडियाचे संस्थापक भरत गीते यांनी केले.

पिंपरी-चिंचवड येथे आयोजित फेस ऑफ इन्स्पिरेशन पुरस्कार सोहळ्यात भरत गीते यांना महाराष्ट्र उद्योगभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच यावेळी प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी गीते यांची प्रकट मुलाखत घेत त्यांचा परळी ते जर्मनी व्हाया पुणे असा प्रवास आणि उद्योगाची यशोगाथा उलगडली. चिंचवड येथील रामकृष्ण मोरे सभागृहात आयोजित सोहळ्यावेळी खासदार श्रीरंग बारणे, पिंपरी-चिंचवडचे महापौर




**रवी लांडगे यांनीही मनोगत व्यक्त केले. आपण समाजाला देणे लागतो, या भावनेतून उभारलेले कार्य समाजाच्या हिताचे असते. औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवडमध्ये जागतिक दर्जाचे ग्रंथालय, शिक्षण व साहित्य उपलब्ध करण्यासाठी पुढाकार घेतला, असून या उपक्रमात उद्योजकांनीही साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. मनीषा थोरात पिसाळ यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. शुभांगी शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. संतोष सौंदणकर यांनी आभार मानले.**

रवी लांडगे, शिवसेना नेत्या सुलभा उबाळे, महावितरणचे अधिकारी धनंजय औंढेकर, शिवसेनेचे सचिव वैभव थोरात, उद्योजक अमेय जैन, संयोजक मनिषा थोरात-पिसाळ व संतोष सौंदणकर आदी उपस्थित होते. भरत गीते यांनी आपल्या जीवनप्रवासातील संघर्ष आणि यशाची कहाणी मोकळेपणाने मांडली. ते म्हणाले, "या प्रवासामध्ये माझी पत्नी प्राची हिचा सिंहाचा वाटा आहे. जर्मनीसारख्या प्रगत देशातील स्थिर आयुष्य सोडून भारतात उद्योग उभारण्याचा निर्णय घेताना, तसेच सुरुवातीच्या अत्यंत खडतर काळात तिने खंबीरपणे साथ दिली. वडिलांनी, मोठ्या भावांनी शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले. अल्युमिनियममध्ये नवे तंत्रज्ञान विकसित करून भारताला आत्मनिर्भरतेकडे नेण्याचा प्रयत्न सुरु आहे. उद्योग केवळ काही शहरांपुरते मर्यादित न राहता ग्रामीण आणि दुर्गम भागातही पोहोचले पाहिजेत." "देवेंद्र फडणवीस हे विकासाभिमुख नेतृत्व असून, राज्यातील औद्योगिक विकासासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे उद्योगांना चालना मिळत आहे. त्यांच्या नेतृत्वात धोरणात्मक काम करण्याची इच्छा असून, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात उद्योग नेण्यासाठी त्यांचे पाठबळ महत्वपूर्ण ठरत आहे. येत्या काळात उद्योग आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रात भरीव काम करून विकासात योगदान देण्यासाठी कटिबद्ध आहे.

कोणत्याही उद्योगात गुणवत्ता आणि नीतिमत्ता या दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात. दीर्घकालीन यश मिळवण्यासाठी केवळ नफा नव्हे, तर प्रामाणिकपणा, पारदर्शकता आणि उत्कृष्टतेला प्राधान्य द्यावे," असेही त्यांनी नमूद केले. श्रीरंग बारणे म्हणाले, "शहराच्या जडणघडणीत विविध भागांतून आलेल्या लोकांचे मोठे योगदान आहे. विशेत: मराठवाडा, विदर्भातील लोकांचा यामध्ये सहभाग आहे.

## सुयश ट्रस्टने ३४५ गावांना दिली 'गूगल पिन'ची ओळख

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

देशातील दुर्गम व आदिवासी भागांमध्ये विकासाची गती वाढवण्यासाठी संपर्क आणि ओळख ही अत्यंत महत्त्वाची बाब मानली जाते. अनेक गावांमध्ये वीज, रस्ते, इंटरनेट आणि बाह्य जगाशी संपर्काची कमतरता असल्याने त्या गावांचे अस्तित्व नकाशावरही स्पष्ट दिसत नाही. अशा परिस्थितीत सुयश चॅरिटेबल ट्रस्टने 'गूगल पिन' नोंदवण्याचा अभिनव उपक्रम राबवून ३४५ दुर्गम गावांना जगाच्या डिजिटल नकाशावर आणले आहे. या उपक्रमामुळे या गावांची ओळख राष्ट्रीय व जागतिक स्तरावर निर्माण होत असून ग्रामविकासाला नवे बळ मिळत आहे. सुयश चॅरिटेबल ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास, कार्याध्यक्ष स्मिता घैसास आणि शलाका घैसास यांच्या नेतृत्वाखाली ट्रस्ट गेल्या ४५ वर्षांपासून भारतातील आठ राज्यांमधील आदिवासी व दुर्गम भागांत सातत्याने काम करत आहे. शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण, जलसंवर्धन आणि ग्रामविकास यांसारख्या विविध क्षेत्रांत संस्थेने उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यातच आता डिजिटल ओळख निर्माण करण्यासाठी 'गूगल



पिन' नोंदवण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहे. गूगल पिन नोंदवण्याचे महत्त्व लक्षात घेता, या उपक्रमामुळे दुर्गम गावांचे अचूक स्थान नकाशावर दिसू लागते. त्यामुळे शासकीय योजना, आपत्कालीन सेवा, आरोग्यसेवा, शिक्षणविषयक उपक्रम तसेच स्वयंसेवी संस्थांची मदत या गावांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ होते. एखाद्या गावाला मदत करायची असल्यास किंवा विकासकामे राबवायची असल्यास त्या गावाचा अचूक लोकेशन डेटा उपलब्ध होणे अत्यंत गरजेचे असते. गूगल पिनमुळे हा डेटा सहज मिळू लागल्याने प्रशासन आणि मदतनीसांना मोठी मदत होत आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.